<u>फौजदारी किरकोळ अर्ज नंबर ११३/२०२२ मधील निशाणी क्रमांक १ वरील आदेश.</u>

<u>(CNR NO.MHSN070009682022)</u>

<u>बळवंत विष्णू कदम वि. महाराष्ट्र सरकार.</u>

सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया सहिंता कलम ४५७ अन्वये पोलीस ठाणे कवठेमहांकाळ गुन्हा नोंद क्रमांक १५/२०२२, भारतीय दंड विधान कलम ४५७, ३८० या गुन्ह्यात पोलीसांनी जप्त केलेले दो-यात ओवलेले सोन्याचे मणी मंगळसूत्र व त्यात पिवळया धातूचे १६ मणी व पिवळया धातूच्या दोन वाटया एकूण किंमत रुपये ५०,०००/- सुपुर्तनाम्यावर परत मिळण्याकरता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अर्जदार यांनी स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे.

२. अर्जदारच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांच्या पत्नीचे वर नमुद सोन्याचे मणी मंगळसूत्र व त्यात पिवळया धातूचे १६ मणी व पिवळया धातूच्या दोन वाटया त्यांच्या मालकीचे व खरेदीचे असुन त्यांची पत्नी त्या दैनंदिन वापरतात. सदरचा मुददेमाल पोलीसांनी वर नमुद गुन्ह्यात जप्त केलेले आहे. सदर जप्त मुददेमाल पोलीस ठाण्यात राहु दिल्यास ते झिजण्याची शक्यता आहे. अर्जदार हे न्यायालय सांगेल त्या अटींची पुर्तता करण्यास तयार आहेत. म्हणुन सदर मुददेमालाचा ताबा सुपुर्तनाम्यावर त्यास मिळावा अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणामध्ये सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्ज कायदयाने चालत नाही. मुददेमालाच्या खरेदी पावत्या या पदमिनी कदम, पदमिनी बळवंत कदम यांच्या नावाच्या असल्याच्या दिसून येतात. पदमिनी कदम या सदर मुददेमालाच्या मालक असल्याने त्यांनी अर्ज दाखल करायला पाहिजे होता. सबब अर्ज नामंजुर करावा, अशी विनंती केली आहे. तपासिक अंमलदार यांनी

त्यांच्या जबाबामध्ये नमूद केले आहे की सदर मुददेमालाच्या कागदपत्रांची व योग्य त्या अटी शर्तीची अर्जदार यांच्याकडून पूर्तता करुन घेवून मुददेमाल त्यांचे ताब्यात देण्यास हरकत नाही.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्हीही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदरचे मंगळसूत्र, मणी व वाटया अर्जदार यांच्या पत्नीच्या असून ते त्यांना ताब्यात मिळावे. उलटपक्षी सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, जप्त मंगळसूत्र पुराव्याचा भाग असल्याने अर्जदारास परत करता येणार नाही. करिता अर्ज नामंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

५. वर्दी जबाबाचे अवलोकन केले. वर्दी जबाबावरुन असे दिसून येते की प्रस्तुत प्रकरणातील मुददेमाल अर्जदाराच्या घरामधून चोरीला गेलेला होता. अर्जदारने जप्त मंगळसूत्र त्यांच्या पत्नीच्या मालकीचे असल्याबाबत मंगळसूत्र,मणी व वाटया खरेदीच्या मूळ तीन पावत्या दाखल केलेल्या आहेत. अर्जदारने दाखल केलेल्या मंगळसूत्र,मणी व वाटया खरेदीच्या पावत्यांवरुन दिनांक ११.०२.२०१२, दि.५.०२.२०१२ व दि. ११.१०.२०२० रोजी त्यांची पत्नी पदमिनी बळवंत कदम यांनी ते खरेदी केल्याचे दिसून येते. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदार यांची पत्नी ही जप्त सोन्याच्या मुददेमालाची मालक असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत अर्जात अर्जदार यांची पत्नी सौ. पदमिनी बळवंत कदम यांनी निशाणी ८ वर त्यांचे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये जप्त मुददेमाल त्यांचे पती म्हणजेच अर्जदार बळवंत विष्णू कदम यांच्या ताब्यात देण्यास त्यांची काही हरकत नसल्याचे कथन केले आहे. गुन्ह्याचे स्वरुप बघता पुराव्याच्या वेळी मुददेमालाची आवश्यकता नाही.

सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांचा विचार करता मुददेमालाचा अंतरिम ताबा देतेवेळी अर्जदार यांच्यावर अटी व शर्ती लादणे

न्याय्य होईल. शिवाय सदर मंगळसूत्र पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास ते झिजण्याची शक्यता असून त्याचे मुल्य कमी होण्याची शक्यता आहे. तसेच अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही सदर मुददेमालाचा ताबा मागितलेला नाही. करिता सदर मुददेमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे योग्य ठरते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. तपासी अंमलदार यांनी दो-यात ओवलेले सोन्याचे मणी मंगळसूत्र व त्यात पिवळया धातूचे १६ मणी व पिवळया धातूच्या दोन वाटया या अर्जदार बळवंत विष्णू कदम, राहणार सलगरे, तालुका मिरज, जिल्हा सांगली यांना रक्कम रुपये ७५,०००/- (पंच्याहत्तर हजार रुपये ) चा सुपुर्तनामा (Indemnity Bond) लिहुन दिल्यावर व त्याची योग्य ओळख पटवुन दिल्यानंतर, खालील अटींवर देण्यात यावा.

**अ.** अर्जदारने सदर गुन्ह्याचा अंतिम निकाल होईपावेतो सदरचा मुद्देमाल कोणत्याही मार्गे हस्तांतर करु नये अगर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

**ब.** अर्जदारने न्यायालय हुकुम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर करणेचा आहे.

**क.** तपासी अधिकारी यांनी अर्जदारच्या खर्चावर सदर मुददेमालाचे छायाचित्र काढुन त्याचा पंचनामा करावा. सदर छायाचित्र, पंचनामा व सदर हानिरक्षण बंधपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE Date: 2022.12.06 10:26:16 +0530

दिनांक ३.१२.२०२२ ( अरुण र. व्यवहारे )

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 3.12.2022
Order signed by the
Presiding Officer on -3.12.2022
Order uploaded on -6.12.2022